विमानतळावर अडकलो आहोत, भारतात कसे येऊ?



नवी दिल्ली, दि. २२, (प्रतिनिधी) : अफगाणींना भारतात येण्यासाठी परराष्ट्र खात्याने ई-व्हिसाची सुविधा उपलब्ध करून दिली असली तरी, काबूलमधील विमानतळ बंद झाल्यामुळे अडकून पडलेले अनेक अफगाणी विद्यार्थी दिल्लीतील परिचितांशी फोन वा मेलवरून संपर्क साधत असून 'भारतात कसे परत येऊ', अशी मेटाकुटीला येऊन विचारणा करत आहेत.

दिल्लीतील 'इंडियन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्स'च्या (आयसीडब्ल्यूए) संशोधन शिष्यवृत्तीधारक (रिसर्च फेलो), डॉ. अन्वेषा घोष या सुमारे ६० अफगाण विद्यार्थ्यांच्या संपर्कात आहेत. परराष्ट्र मंत्रालयाच्या अखत्यारीत 'आयसीडब्ल्यूए'चे आंतरराष्ट्रीय संशोधन होते. घोष वैयक्तिक स्तरावर काही अफगाण विद्यार्थ्यांना परराष्ट्र खात्याच्या निर्णयांची माहिती देऊन मदत करण्याचा प्रयत्न करत आहेत. 'माज्याशी ज्या अफगाण विद्यार्थ्यांनी संपर्क साधला, त्यापैकी अनेकांनी आंतरराष्ट्रीय संस्थांशी, विविध देशांच्या सरकारांबरोबर काम केले आहे.

भारतात शिक्षण घेतलेल्या, कुठल्या ना कुठल्या मागार्ने भारताशी संबंध असलेल्या विद्यार्थ्यांवर नजर ठेवली जात आहे. भारतात येऊन गेलेले हे सगळे विद्यार्थी घाबरलेले आहेत. इतक्या लवकर परिस्थिती बिघडेल असे त्यांना वाटलेच नव्हते', असे अन्वेषा घोष म्हणाल्या. 'माज्याकडे भारतात येण्यासाठी शैक्षणिक व्हिसा आहे पण, विमानतळावर अडकून पडलो आहे. अफगाणिस्तान सोडले नाही तर आमचे आयुष्य संपले', असे भारतात शिकणाऱ्या पण, करोनामुळे मायदेशी गेलेल्या विद्यार्थ्यानें घोष यांना काबूल विमानतळावरून सांगितले. एका विद्यार्थिनीचे पारपत्र भारतीय दूतावासाकडे होते.

दूतावासाने व्हिसा प्रक्रियेचे काम स्थानिक खासगी कंपनीला दिलेले आहे. दोन दिवसांपूर्वी तालिबानींनी या कंपनीचे कार्यालय बंद केले. त्यामुळे पारपत्र नाही आणि व्हिसाही नाही अशा कोंडीत या विद्यार्थिनीला काबूलमध्ये थांबावे लागले आहे. गेल्या तीन-चार दिवसांमध्ये अनेकांनी व्हिसासाठी या कंपनीकडे अर्ज केले होते, कागदपत्रे कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडे होती. आता कर्मचारीही नाहीत आणि कागदही मिळण्याची शक्यता नाही. योग्य कागदपत्रांविना भारतीय दूतावासही या अफगाणींना ई-व्हिसा देऊ शकत नाही, असे घोष यांचे म्हणणे आहे.

अमेरिकेचे सैनिक शेवटची आशा

अमेरिकेचे सरकार त्यांच्या नागरिकांना बाहेर काढत असल्यामुळे अजूनही काबूल विमानतळावर त्यांचे सैनिक तैनात आहेत, अफगाण विद्यार्थ्यांसाठी हे सैनिक शेवटची आशा आहेत. अमेरिकेची ही मोहीम पूर्ण होण्याआधी कसेही करून बाहेर पडता आले तरच अफगाणिस्तान सोडता येईल. अमेरिकेने पूर्णतः गाशा गुंडाळला तर आयुष्य संपले अशा भावना या विद्यार्थ्यांनी घोष यांच्याकडे बोलून दाखवल्या. भारताने ई-व्हिसा देण्याचा निर्णय घेतला असला तरी, तेथील परिस्थिती इतकी स्फोटक आहे की, या निर्णयाची अंमलबजावणी कशी करायची याबद्दल परराष्ट्र मंत्रालयातही स्पष्टता नाही. शिवाय, देशाची सुरक्षा हा ई-व्हिसा मंजूर करण्यातील सर्वात मोठी चिंता आणि अडचण मंत्रालयासमोर असल्याचे घोष म्हणाल्या.

विद्यार्थ्यांच्या जिवाला धोका

पुणे, अहमदाबाद, बंगळूरु, हैदराबाद, दिल्ली या वेगवेगळ्या शहरांमधील विद्यापीठांमध्ये शिष्यवृत्तीधारक अफगाण विद्यार्थी शिकतात. करोनामुळे ऑनलाइन शिक्षण सुरू असल्याने अनेक अफगाणिस्तानला गेले आहेत. काही विद्यार्थी मजार-ए-शरीफ, हैरात या शहरांतील आहेत, ते आता काबूलमध्ये आलेले आहेत. तालिबानींना काबूलचा ताबा घ्यायला वेळ लागेल, तोपर्यंत भारतात पोहोचता येईल असे त्यांना वाटले होते. पण काही तासांत काबूल हातातून गेले. हे विद्यार्थी पश्तुनेतर ताजिक, हजारा वांशिक असल्याने त्यांच्या जिवाला अधिक धोका असल्याचे घोष यांनी सांगितले.

अमेरिकन सैनिकांची मदत करणाऱ्यांची शोध मोहीम; शरण न आल्यास...



काबूल, दि. २२, (प्रतिनिधी) : अफगाणिस्तानमध्ये तालिबानने सत्ता हातात घेतल्यानंतर गेली २० वर्षे अमेरिकन सैनिकांना साथ देणाऱ्यांची झाडाझडती सुरु केली आहे. दहशतवादी घराघरात जाऊन अमेरिका, ब्रिटिश आणि नाटो सैनिकांना मदत करण्याऱ्या अफगाण नागरिकांचा शोध घेत आहेत. मदत करणारे लोक पुढे आले नाहीत, तर कुटुंबियांना परिणाम भोगावे लागतील, असा इशारा तालिबानने दिला आहे. संयुक्त राष्ट्राच्या गोपनीय अहवालात याबाबतचा खुलासा करण्यात आला आहे.

तालिबानचे दहशतवादी अमेरिका आणि नाटो सैनिकांना मदत करण्याऱ्यांचा शोध घेत आहेत. त्यांच्या घरी जाऊन तपास केला जात आहे. दहशतवाद्यांकडे काही लोकांची यादी आहे. ही लोकं सैनिकांना मदत करत होती याची माहिती त्यांनी मिळवली आहे. जर ही लोकं शरण आली नाही, तर त्यांच्या कुटुंबीयांना मारण्याची किंवा अटक करण्याची धमकी देण्यात आली आहे, असं संयुक्त राष्ट्राच्या विशेष तज्ज्ञांच्या समितीने दिलेल्या गोपनीय अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

दुसरीकडे जलालाबादमध्ये स्थानिक नागरिकांनी तालिबानऐवजी अफगाणचा झेंडा फडकवत विरोध दर्शवला होता. तसेच एका रॅलीचं आयोजन केलं होतं. यावर संतापलेल्या तालिबानने गर्दीवर गोळीबार केला. यात अनेक जण जखमी झाले आहेत.

दुसरीकडे, तालिबानने काबूलवर ताबा मिळवत अफगाणिस्तान आपल्या अमलाखाली आल्याचे म्हटले आहे. मात्र अद्यापही अफगाणिस्तानमध्ये अशा काही जागा आहेत जिथे तालिबान्यांना अद्याप पोहोचता आलेलं नाही. अफगाणिस्तानातील पंजशीर व्हॅलीचा भाग अशाच ठिकाणांपैकी आहे. तालिबानला पंजशीर व्हॅलीवर विजय मिळवणे कठीण जात आहे. आताही पंजशीर व्हॅली तालिबानच्या विरोधात खंबीरपणे उभे आहे. अमरूल्लाह सालेह पंजशीरमध्येच आहेत. तालिबानच्या विरोधात प्रतिकार करण्यासाठी सालेह यांनी पंजशीर व्हॅलीचा भाग निवडला आहे. सालेह यांनी स्वतःला अफगाणिस्तानचे काळजीवाहू अध्यक्ष म्हणून घोषित केले आहे.

माजी राष्ट्रपती अशरफ घनी यांच्या भावाची तालिबानशी हातमिळवणी



काबूल, दि. २२, (प्रतिनिधी) : तालिबानने अफगाणिस्तानवर ताबा मिळवल्यानंतर राष्ट्रपती अशरफ घनी यांनी पलायन केलं. आता अशरफ घनी यांच्या भावाने तालिबानशी हातमिळवणी केली आहे. हशमत गनी अहमदजई यांनी तालिबानला समर्थन देण्याचा घोषणआ केली आहे. कुचिसच्या ग्रँड कॉन्सिलचे प्रमुख हशमत गनी अहमदडई याने तालिबान नेते खलील-उर-रहमान आणि धार्मिक नेते मुफ्ती महमूद झाकीर यांच्या उपस्थितीत समर्थनाची घोषणा केली. हशमत गनी सोबत आल्याने तालिबानची ताकद आणखी वाढली आहे. हशमत गनी अफगाणिस्तानातील प्रभावशाली नेते आहेत. अशरफ घनी यांनी अफगाणिस्तानचे राष्ट्रपती असताना त्यांच्या भावाला आणि एका अमेरिकन कंत्राटदाराला खनिज प्रक्रिया परवानगी मिळवण्यास मदत केल्याचे म्हटले जाते. त्यांच्याकडे अमेरिका, दुबई, पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये कोट्यवधी किमतीची जमीन आहे.

दुसरीकडे, अफगाणिस्तानचे अध्यक्ष अशरफ घनी यांनी पैशांच्या अनेक बॅगा घेऊन देशातून पळ काढल्याचे आरोप फेटाळून लावले आहेत. हे सर्व आरोप बिनबुडाचे आहेत असं घनी यांनी म्हटलं आहे. तसेच हे आरोप राजकीय हेतूने आणि छवी बिघडवण्यासाठी करण्यात आल्याचा आरोप घनी यांनी केल्याचं अल झजीराने दिलेल्या वृत्तात म्हटलं आहे. सोमवारी काबूलमधील रशियन दुतावासाने घनी हे मोठ्याप्रमाणात रोख रक्कम आपल्या सोबत घेऊन गेल्याचा आरोप केला होता. कार आणि हेलिकॉप्टरमधून घनी पैसे घेऊन देशातून पसार झाल्याचा दावा करण्यात आला होता.

घनी नक्की कुठे आहेत?

राष्ट्रपती अशरफ घनी आपल्या कुटुंबासह अबू धाबीमध्ये आहेत. संयुक्त अरब अमिराती (यूएई) च्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने या वृत्ताला दुजोरा दिलाय. मानवतेच्या आधारावर युएई राष्ट्रपती अशरफ घनी आणि त्यांच्या कुटुंबाला आश्रय देत आहे, असं यूएईने म्हटलं आहे. २० वर्षांच्या लढाईनंतर अखेर रविवारी तालिबानने अफगाणिस्तानचा ताबा घेतला आहे. देशात हिंसाचाराला सामोरे जावं लागू नये म्हणून अनेकांनी देश सोडला आहे. दरम्यान राष्ट्रपती अशरफ घनी देखील देश सोडून पळून गेलेल्यांमध्ये आहेत.

मुबलक निधी देऊनही प्रभावी पद्धतीने काम नाही, प्रदूषण नियंत्रण मंडळ करणार दंडात्मक कारवा

सोलापूर, दि.२२ (हिंदुस्थान समाचार) : जिल्ह्यातील नगरपालिकांना घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत ३ ते ५ वर्षांचा कालबद्ध कार्यक्रम आखून दिला होता. यामध्ये जिल्ह्यातील १२ नगरपालिका नापास झाल्या आहेत. पाच वर्षांचा कालावधी संपला तरी जुन्या साठलेल्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया न केल्याचे पाहणीत आढळून आले आहे. यासाठी पाच वर्षांची मुदत दिली होती. पण संबंधित नगरपालिकांनी यावर अंमलबजावणी न केल्याने प्रधान सचिवांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. भविष्यात जिल्हाधिकारी, नगर प्रशासन अधिकारी व मुख्याधिकारी यांच्यावर होणारी कारवाई टाळण्यासाठी नगरपालिकांनी घनकचरा व्यवस्थापन नियमांची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत.

पालिकेने कारवाई करत जप्त केले ८७ किलो प्लास्टिक

पुणे, दि.२२ (हिंदुस्थान समाचार) : कोथरूड बावधन क्षेत्रीय कार्यालय पुणे म हापालिका आरोग्य विभागाच्या वतीने 'स्वच्छ भारत अभियान व स्वच्छ सर्वेक्षण २०२१ अन्वये प्रभाग क्रं. १२ डहाणूकर कॉलनी व कोथरूड गावठाण हजेरी कोठी अंतर्गत' स्वच्छतेपासून मुक्तता तसेच प्लॅस्टिक मुक्त पुणे शहर जनजागृती अभियान राबविले.या अभियानाच्या दुसऱ्याच दिवशी अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीत ८७ किलो प्लास्टिक जप्त करत व्यापाऱ्यांकडून ४७ हजार ७०० रुपये दंड वसूल करण्यात आला. यात कोथरूड बावधन क्षेत्रिय कार्यालय पुणे महानपालिका आरोग्य विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या प्लास्टिक मुक्त अभियानात प्लॅस्टिक मुक्त पुणे शहर करण्यासाठी म हापालिकेच्या कर्मचाऱ्यांबरोबर व्यापारी संघटनेचे कोथरूड विभागाचे अध्यक्ष शशिकांत उभे व अन्य त्यांचे सहकारी पदाधिकारी, भाजी विक्रेते, फळ विक्रेते, पथारीवाले व नागरिक जनजागृती कार्यक्रम ात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

जाहिर नोटीस

कै. नीरा तुकाराम गायकर (मिल कामगार) हे दिनांक २३/०७/२००८ व कै. संजय तुकाराम गायकर (मुलगा) हे दिनांक १६/०६/२०२० रोजी मयत झाले.
त्याचे वारस खालीलप्रमाणे
१) सुप्रिया संजय गायकर (सून व पत्नी) अर्जदार
२) विजय तुकाराम गायकर (मुलगा)
३) राजेश तुकाराम गायकर (मुलगा)
तरी त्याबद्दल कुणाला आपत्ती असल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधवा. सदर नोटीस म्हाडा कार्यालयात देन्याकरिता आहे.
पत्ता: रूम नं. ३१ २/३, हिम्मत नगर झोपडपट्टी, साल्ट पेन रोड, विद्यालंकार कॉलेज जवळ, वडाळा, मुंबई-४०००३७.

नमुना क्र.७५

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
बृहन्मुंबई विभाग मुंबई
धर्मादाय आयुक्त भवन, २ रा मजला, ८३ डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०००१८

चौकशीची जाहीर नोटीस

अर्ज क्रमांक: सधआ-१०/ १६३०/ २०२१
सार्वजनिक न्यासाचे नाव:
URVI FOUNDATION बाबत.
ROHAN SITARAM PULASKAR अर्जदार.

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, **सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१०, बृहन्मुंबई विभाग, मुंबई** हे वर नमूद केलेल्या अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) : रोख रु. ५०००/- (अक्षरी रूपये पाच हजार केवळ)
ब) स्थावर मिळकत (वर्णन) : निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांच्या आंत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १३/०७/२०२१ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधीक्षक (न्याय),
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

LIBAS CONSUMER PRODUCTS LIMITED

CIN: L18101MH2004PLC149489
Regd. Off.: 401, 4th Floor, Crecent Royale,
Off New Link Road Lokhanwala Complex, Andheri (West), Mumbai-400053
E-mail: cs@libas.co.in
Website: www.libasdesignsltd.com

NOITCE OF 17 TH AGM, REMOTE E-VOTING AND BOOK CLOSURE INFORMATION

NOTICE is hereby given that the 17th Annual General Meeting (AGM) of the Members of Libas Consumer Products Limited will be held on will be held on Tuesday, September 14, 2021, at 12:30 P.M. at the Registered Office of the Company situated at Libas Consumer Products Limited, 401, 4th Floor, Crescent Royale, Off New Link Road, Lokhandwala Complex, Andheri (West), Mumbai- 400053, Maharashtra, to transact the business as set out in the Notice of AGM.In compliance with provisions of Section 108 of the Companies Act, 2013 read with Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014, as amended from time to time, and Regulation 44 of the Listing Regulations:
a)The Company is providing remote e-voting facility to its Members to cast their vote by electronic means on the resolutions set out in the Notice of the said AGM.
b)The remote e-voting shall commence on Saturday, September 11, 2021 at 10.00 a.m. and shall end on Monday, September 13, 2021 at 5.00 p.m.
c)The cut-off date for determining the eligible members for voting is September 7,2021.
The Annual Report is also available on the website of the Company www.libasdesignsltd.com and on the website of Stock Exchange at www.nseindia.com and Notice of AGM is available on website of National Securities Depository Limited (NSDL) at www.evoting.nsdl.com
Pursuant to the provision of Section 91 of the Act read with Rules made thereunder and Regulation 42 of LODR, the Register of Members and transfer Book of the Company will be closed from September 8, 2020 to September 14, 2020 (both days inclusive) for the purpose of AGM and 1% Final Dividend i.e. INR 0.10 per equity shares as recommended by the Board to the members for declaration at their AGM, for the Financial Year 2020-21, The Dividend, if approved, will be payable on or after September 19, 2021 to those shareholders whose names appear in the Register of Members on cut-off date i.e. date prior to the date of book closure.
The Record Date for the purpose of Bonus, if approved by the shareholders in AGM, shall be September 22, 2021.

August 23, 2021
Mumbai

For Libas Consumer Products Limited
Sd/-
Nita Mishra
Company Secretary

SRI ADHIKARI BROTHERS TELEVISION NETWORK LIMITED

CIN: L32200MH1994PLC083853
Regd. Office: 6th Floor, Adhikari Chambers, Oberoi Complex, New Link Road, Andheri (West), Mumbai - 400 053, **Tel:** 022-4023 0000; **Fax:** 022-2639 5459,
Website: www.adhikaribrothers.com, **Email Id:** investorservices@adhikaribrothers.com

NOTICE TO SHAREHOLDERS FOR 26TH ANNUAL GENERAL MEETING

Notice is hereby given that the 26th (Twenty Sixth) Annual General Meeting ("AGM") of the members of Sri Adhikari Brothers Television Network Limited ("the Company") will be held on **Thursday, 16th of September, 2021 at 3.00 p.m. (IST)** through Video Conferencing ("VC")/ Other Audio -Visual Means ("OAVM"), in compliance with all the applicable provisions of the Companies Act, 2013 ("Act") and rules framed thereunder read with General Circular dated April 8, 2020, April 13, 2020 and May 5, 2020 and January 13, 2021 , issued by the Ministry of Corporate Affairs ("MCA Circulars") and SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("the Regulations") read with SEBI Circular dated May 12, 2020 and January 15, 2021.
In compliance with the aforementioned circulars, the Notice of the AGM along with Annual Report for the Financial Year 2020-2021 will be sent only through electronic mode by e-mail to those Members, whose names appear in the Register of Members / Beneficial Owners maintained by the Depositories as on Friday, August 20, 2021 and whose email addresses are registered with the Company or the Registrar and Share Transfer Agents or their respective Depositories. Members can join and participate in the AGM through VC/OAVM only. The instructions for joining the AGM and the manner of participation in the Remote e-voting or casting vote through E-voting during AGM will be provided in the Notice of the AGM. Members participating through the VC/OAVM shall be counted for the purpose of reckoning the quorum under Section 103 of the Act. The Notice and the Annual Report will also be made available on the website of the Company at www.adhikaribrothers.com , website of the Stock Exchanges i.e. BSE Limited and National Stock Exchange of India Limited at www.bseindia.com and www.nseindia.com respectively, and on the website of the NSDL at https://www.evoting.nsdl.com. Necessary arrangements have been made by the Company with NDSL to facilitate Remote e-voting and E-voting during the AGM.
Manner of casting vote through e-voting: The Members who are holding shares in physical form or who have not registered their e-mail address with the Company / Depository or any person who acquires shares of the Company and becomes a Member of the Company after the Notice has been sent electronically by the Company, and holds shares as of the cut-off date, i.e. Friday, September 10, 2021, may obtain the User ID and password by sending a request at helpdesk.evoting@nsdl.com or rnt.helpdesk@linkintime.co.in . However, if a Member is already registered with NDSL for Remote e-voting and E-voting, then existing User ID and password can be used for casting vote.
Manner of registering e-mail address: The Members who have not registered their email address and holding Equity Shares in Demat form are requested to register their e-mail address with the respective Depository Participant ("DP") and the Members holding Equity Shares in physical Form may get their e-mail addresses registered with Registrar & Share Transfer Agent ("RTA") of the Company i.e. Link Intime (India) Private Limited by sending the request at rnt.helpdesk@linkintime.co.in. The Members are requested to provide details such as Name, Folio Number, Certificate number, PAN, mobile number and e-mail id, etc.
The Members are requested to carefully read all the Notes set out in the Notice of the AGM and in particular, instructions for joining the AGM, manner of casting vote through Remote e-voting and E-voting during the AGM and attending the AGM through VC/ OAVM

For Sri Adhikari Brothers Television Network Limited
(Company under Corporate Insolvency Resolution Process,
By the order of Resolution Professional)
Sd/-
Komal Jhamnani
Company Secretary & Compliance Officer
(ACS: 59224)

Place : Mumbai
Date : 23rd August, 2021

जाहिर सुचना

मी, **आसावरी विशाल सासवडकर राहणार: ई.एम.पी. ७३/६०३, एव्हरशाईन मिलेनियम पॅरेडाईज, ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व), मुंबई- ४००१०१.** जाहीर करते की माझे पति **विशाल रमेशचंद्र सासवडकर** यांचा मृत्यु दि. **१०/०४/२०२१** रोजी झाला. त्यांचे नावावर

MARUTI ERTIGA GREEN VXI
Regn. No. (MH47K0951)
Chassis No. MA3ELMG1S00360732
Engine No. K14BN7114041

गाडी रजीस्टर्ड आहे. ज्याचे कायदेशीर वारसदार मी आहे आणि माझ्या नावावर ट्रान्सफर करण्यासाठी **R.T.O. दहिसर** येथे अर्ज केला आहे. जर कोणाला काही हरकत असल्यास त्यांनी **१५ दिवसांचे** आत **R.T.O. दहिसर** येथे संपर्क करावा.

SAD DEMISE

This Is To Inform In Public That
MR IDRIS HANIF QURESHI
husband of
MRS NASEEM IDRIS QURESHI
passed away peacefully in
Mumbai on 28/08/2020.

Deeply Mourned By :
His Family Members & Friends.

NOTICE

Shri. NARAYAN G PATIL member / owner of address: Flat - 407, B wing, Shree Ganesh Co.Operative Housing Society Ltd., Sarvodaya Complex, Kashimira, Mira Road (E), Thane - 401107. And holding Share Certificate No. 35, Distinctive No. 171 to 175 which has been reported lost / misplaced.
Therefore if any person has any objection or claim should contact the society secretary within 15 days of publication of this Notice.
There after no claim will be considered & society will proceed for issue of duplicate share certificate.
For Shree Ganesh CHSL
Sd/-
Hon. Secretary
Place: Mumbai
Date: 23-08-2021

PUBLIC NOTICE

Notice is hereby given that MR. RAJESH HIRALAL MEHTA was expired on 11-04-2021 at Nalasopara. That MR. RAJESH HIRALAL MEHTA used to hold the Maruti Suzuki Celerio ZXI, HatchBack – Petrol registration no. MH-48-AW-4350, Chassis No. 479230. Engine No.41725 and Honda Activa, Registration Number- MH-48-X-7431 Engine No.307078, Chassis No.07730. MR. RAJESH HIRALAL MEHTA leaving behind his wife MRS. KAJAL RAJESH MEHTA being the next legal heir thus MRS. KAJAL RAJESH MEHTA desires to apply and transfer above mentioned vehicle in her name. So I KAJAL RAJESH MEHTA hereby invites claims/objections within a period of 15 days from this notice any person having any kind of claim/ objection should contact at the address, H/101, Neminath Nagar, Achole Road Nalasopara East, Palghar- 401209 with copies of such documents, proofs, in support-of their claims, demands etc. If no claims/objections are received within 15 days of this notice, then I MRS. KAJAL RAJESH MEHTA will be free to transfer the above vehicle of late MR. RAJESH HIRALAL MEHTA expired on 11-04-2021 and no claims thereafter will be entertained.

NOTICE

Notice is hereby given that certificate for the under mentioned share of the housing society (Mahalaxmi CO.OP. HSG SOC. LTD., C.S. Road 4, Dahisar- East, Mumbai 400068.) CST # 1513 has been lost and the holder of the said certificate has applied to the society for issue of duplicate share certificate.
Any person who has any claim in respect of the said certificate should lodge such claim with housing society at registered office with in 15 days from the date of the publication of the notice. In the absence of any claim society shall proceed to issue duplicate certificate without further intimation.
Member register # 25
Name of the share holder :
Ms. Hina Kausar Bangdiwalla
Distinctive # 121 to 125
Shares : 5
Place: Mumbai Date: 23rd August, 2021

PUBLIC NOTICE

Notice is hereby given that my clients 1) SMT. RUPALI RAJENDRA CHAVAN and 2) SHRI RAJENDRA RAMESH CHAVAN, presently residing at 5/2, A-Wing, Shree Siddheshwar Co-operative Housing Society Limited, Kapus Kamgar Nagar, Kurla (East), Mumbai-400 024, intend to purchase the Tenement mentioned in the Schedule hereunder, from SMT. YASHODA DAGADU WAYAL who is the owner of Tenement mentioned in the Schedule hereunder and is member of Nehru Nagar Ratnadeep Co-operative Housing Society Limited, having its registered address at Bldg. No. 60, Nehru Nagar, Kurla (East), Mumbai-400024 and is holding Shares with distinctive No. 11 to 15 (both inclusive) issued under Share Certificate No. 3, in respect of the Tenement mentioned in the Schedule hereunder. The Tenement mentioned in the Schedule hereunder was initially allotted in the name of SHRI DAGADU LAXMAN WAYAL and after his sad demise was transferred in name of his widow SMT. YASHODA DAGADU WAYAL by the above said Siciety.
Claims or objections are hereby invited from the heir or heirs or other claimants/objector to the sale-transaction of the said Tenement (mentioned in Schedule hereunder) and its Shares, within 15 (Fifteen) days from the date hereby along with supporting documents to the undersigned at his address at Bldg. No. 12, Flat No. 409, 3rd Floor, Dignity CHS, Nehru Nagar, Kurla (East), Mumbai - 400 024. If no claims/objections of whatsoever nature are received within 15 days from the date hereof, my clients will be free to complete the above said sale-transaction of the Tenement (as mentioned in the Schedule hereunder) along with its shares, and claim of such person(s) will be deemand to have been waived and/or abandoned.
SCHEDULE
Tenement No. 1943 in Building No. 60, Nehru Nagar, Ratnadeep Co-Operative Housing Society Limited, Nehru Nagar, Kurla (East), Mumbai - 400024. Plot of Building situated on Survey No.229-267, C.T.S. No. 12 (part) of Village Kurla-3, Mumbai Suburban District, L-Ward.

Sd/-
P. B. GHORPADE
ADVOCATE, HIGH COURT
Place: Mumbai
Date: 23.08.2021
Bldg. No. 12, Flat No. 409, 3rd Floor, Dignity CHS., Nehru Nagar, Kurla (E), Mumbai - 400 024. Mob.: 9820881078

परिशिष्ट क्र. १६
(उपविधी क्र. ३५ अन्वये)

नोटीस

प्रभादेवी एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या, काशीनाथ धुरुवाडी, राजाभाऊ देसाई मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५ या संस्थेचे सभासद असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत सदनिका धारण करणाऱ्या खालील सभासदाचे निधन झाले आहे.

मयत सभासदाचे नाव	मृत्यु दिनांक	वारसाचे नाव	रुम नं.
यशवंत भाऊ सावंत	०८/०७/२०१९	उदय यशवंत सावंत	२/३२८

यांनी संस्थेकडे वारस नोंदणीबाबत अर्ज दाखल केला असून संस्था या जाहिरातीद्वारे संस्थेच्या भांडवलात /मालमत्तेत असलेले मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदाचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागविण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ७ दिवसांत त्यांनी आपल्या मागण्यांच्या व हरकतीच्या पुष्ठर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमुद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तींकडून हक्क मागण्या किंवा हरकत सादर झाली नाही तर मयत सभासदाचे संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्क मागण्या /हरकत आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधी-नुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधीची एक प्रत मागणीदारास / हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात संस्थेचे अध्यक्ष /सचिव यांच्याकडे सकाळी ११.०० ते ०१.०० पर्यंत नोटीस दिलेच्या तारखेपासून नोटीसीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २३/०८/२०२१

सही/-
अध्यक्ष /सचिव
प्रभादेवी एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

संयुक्त जाहीर सूचना

(आरबीआय परिपत्रक क्र.आरबीआय/२०१५-१६/१२२डीएनबीआर(पीडी) सीसी क्र.०६५/०३/१०.००१/२०१५-१६ दि.९ जुलै, २०१५ नुसार)

आयनॉक्स लिझींग ॲण्ड फायनान्स लिमिटेड

नोंद.कार्या.: ६९, जॉली मेकर चेंबर्स २, नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१.
दूर.:+९१-४०३२३१९५, फॅक्स:+९१-४०३२३९९१
सीआयएन: यु६५९१०एमएच१९९५पीएलसी०८५७०३
वेबसाईट:info@ilfl.co.in, ई-मेल:www.ilfl.in

संयुक्तपणे येथे सूचना देण्यात येत आहे की:

१) आयनॉक्स लिझींग ॲण्ड फायनान्स लिमिटेड, कंपनी कायदा १९५६ अंतर्गत स्थापन झालेली कंपनी, यांचे नोंद.कार्या.: ६९, जॉली मेकर चेंबर्स २, नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१ येथे आहे, जे नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी (कंपनी) म्हणून भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय) सह नोंदणीकृत आहेत.

२) श्री. विवेक जैन हे कंपनीचे विद्यमान प्रवर्तक व भागधारक आहेत (नियोजित हस्तांतरीती); आणि

३) श्री. पवनकुमार जैन, श्रीमती नयनतारा जैन, श्री. सिद्धार्थ जैन, श्रीमती ईशिता जैन व श्रीमती श्रेयसी गोयंका (नियोजित हस्तांतरकर्ता), आयनॉक्स लिझींग ॲण्ड फायनान्स लिमिटेडचे प्रवर्तक व भागधारक, हे कंपनीचे विद्यमान प्रवर्तक व प्रवर्तक समुहाचे सदस्य असून कंपनीचे विद्यमान भरणा केलेले समभाग भांडवलाचे ४७.२५% असे भारतीय चलन रुपये १० प्रत्येकीचे (भारतीय रुपये) दर्शनी मुल्याचे ४७,२२,०८४ समभागांचे धारक आहेत.

आयबीआयद्वारा वितरीत नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज (ॲप्रुवल ऑफ एक्विझीशन ऑर ट्रान्सफर ऑफ कंट्रोल) डायरेक्शन्स, २०१५ नुसार संदर्भ क्रमांक डीएनबीआर.(पीडी)०२९/सीजीएम (सीडीएस)-२०१५ दि.९ जुलै, २०१५ आणि इतर लागू कायद्यान्वये (निर्देशन).

१. अंतर्गत पुर्नरचनेनुसार नियोजित हस्तांतरकर्त्यांना नियोजित हस्तांतरीतीच्या नावे त्यांची भागधारणा हस्तांतर करण्याची इच्छा आहे आणि मंडळ स्थरावर काही बदल करण्याचे इच्छा आहे.
२. निर्देशनाच्या नियमानुसार भागधारणा व संचालनामधील बदलाकरिता विहित पद्धतीने उपरोक्त प्राप्तीकरणाची प्रक्रिया केली जाईल.

उपरोक्त व्यवहाराचे परिणास्वरुपी कंपनीच्या भागधारणेतील नियोजित बदलाची सूचना जनतेस देण्याकरिता सदर सूचना देण्यात येत आहे.

याबाबत काही स्पष्टीकरण असल्यास कंपनीकडे सदर सूचनेच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत श्री. विजय सक्सेना, कंपनी सचिव यांच्याकडे कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात पाठवावे किंवा info@ilfl.co.in वर ई-मेल करावा.

आयनॉक्स लिझींग ॲण्ड फायनान्स लिमिटेड
सही/-
श्री. विवेक जैन
सही/-
श्री. पवन कुमार जैन (हस्तांतरीती)
ठिकाण: मुंबई
दिनांक: २३ ऑगस्ट, २०२१